**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**एमएमटीसी हाऊस, ५ वा मजला**
**प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई ,**
**वांद्रे कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१.**

**संकेतस्थळ**– www.mahabocw.in
**दुरध्वनी व फॅक्सक्र.** ०२२-२६५७२६३१
**ई-मेल**- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र/383 /२०२५/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२ दिनांक : 27 FEB 2025

**प्रति,**

१. अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुकत
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/नाशिक/छ. संभाजीनगर

२. कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी/
जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)// तालुका कामगार सुविधा केंद्र (सर्व)

**विषय :-** एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर प्राप्त होणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नूतणीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर सर्वकष सूचना देणेबाबत.

**संदर्भ :-** १.मंडळाचे पत्र क्र.१८८५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. २०.१०.२०२३
२. मंडळाचे पत्र क्र. १९९४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. ०३.११.२०२३.
३. मंडळाचे पत्र क्र. २११४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. २२.११.२०२३.
४. मंडळाचे पत्र क्र. २४११-अ/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. ०१.०१.२०२४
५. मंडळाचे पत्र क्र. २५३/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. ०५.०२.२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्ये मंडळाच्या संदर्भाधिन क्र ५ रोजीच्या पत्रांन्वये सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्राअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नोंदणी/नूतणीकरण/लाभ वाटप करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्वकष सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामार्फत नोंदणी/ नुतणीकरण व लाभ वाटपाचे कामकाज सुरू आहे.

२. बांधकाम कामगार नोंदणी/नुतणीकरणा- करिता ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी ज्या दिवशी अर्ज सादर केला आहे त्या दिनांकापासून मागील १ वर्षात ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदरचे प्रमाणपत्र खाजगी कंत्राटदाराचे सादर केले जाते. असे खाजगी कंत्राटदार कोणत्याही शासकीय आस्थापनेखाली नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तथापि, असे खाजगी कंत्राटदार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत नसल्याचे कारण देऊन नोंदणी अधिकारी अर्ज रद्द करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

३. सबब, आपणास कळविण्यात येते की, ९० दिवसाचे खाजगी कंत्राटदाराचे प्रमाणपत्र तपासतेवेळी सदरचा कंत्राटदार कोणत्याही शासकीय आस्थापनेकडे नोंदणीकृत आहे का याबाबतची खातरजमा करावी तथापि, कंत्राटदाराची मंडळाकडे नोंदणी नाही याकारणास्तव नोंदणी/नुतणीकरण अर्ज रद्द करू नये.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई